## UNIVERSITY GRANT COMMISION

### WESTERN REGIONAL OFFICE

### GANESHKHIND, PUNE-411007

**Minor Research Project**

**Project Tital : संत तुकारामांचा संत विषयक दृष्टिकोन : एक अभ्यास**

**Project Researcher : Dr. Ravindra Vaijnathrao Bembare**

**14. SUMMARY OF THE FINDINGS**

**निष्कर्षात्मक सारांश :-**

विविध शब्दकोशातून सज्जन आणि परोपकारी माणसाला साधू संबोधले आहे. आपल्या धर्मातील तत्त्वज्ञानानुसार आचरण करून जगासमोर धर्माचा आदर्श प्रस्थापित करणारा सदाचारी व्यक्ती म्हणजे साधू असे सांगितले आहे. संत शब्दाची उत्पत्ती संस्कृतमधील सत् शब्दापासून झालेली आहे. संस्कृत भागवतात सत् हा शब्द सद्भाव, साधुभाव, प्रशस्त कर्म या अर्थाने वापरण्यात आला आहे. महाभारतात सावित्री आणि यमाच्या संवादातून मन, वाचा आणि कृतीतून कुणाचाही द्वेष न करता सर्वावर उपकार करणाऱ्या परोपकारी व्यक्तीला संत संबोधले आहे. योगवसिष्टात लौकिक मान अपमान, सुख दु:ख या गोष्टीकडे स्थिर बुद्धीने पाहणारा, लोकोद्धारार्थ झटणारा, निरपेक्षपणे मदतीचा हात देणारा व्यक्ती म्हणजे संत आणि साधू असे सांगितले आहे.

मी आणि माझे या पलीकडे जाऊन विश्वातील सर्व प्राणीमात्राबद्दल व्यापक सहानुभाव जोपासणारा, विवेकनिष्ठ व्यक्ती म्हणजे संत असे ज्ञानेश्वरांनी सांगितले आहे. ज्याला संत व्हायचे आहे, त्याने जगाचे बोलणे सहन करून जगाचे कल्याण साधले पाहिजे असे मुक्ताईने सांगितले. सदगुणी हरिभक्त म्हणजे संत असे निवृत्तीनाथांनी सांगितले.

सर्व विकारापासून मुक्त होऊन चराचर सृष्टीशी तादात्म्य पावणे म्हणजे संतत्व अशी नामदेवांची भूमिका आहे. समाजाला सन्मार्गाला लावण्यासाठी संतांची गरज असल्याचे जनाईने प्रतिपादित केले. संतांनी येथील जडजीवाचा उद्धार केला म्हणून गोरा कुंभार संतांना ब्रह्मदेवाचा अंश संबोधतात. सावता माळी प्रतीपरमेश्वर म्हणून ते संताकडे पाहतात.

संत कळण्यासाठी आपल्या अंगी संतत्व असले पाहिजे असे चोखा मेळा सांगतात. शेख महमदांनी सदगुरूबद्दल जे चिंतन केलेले आहे त्यातून त्यांचा संत विषयक दृष्टिकोनच प्रकटला आहे. कोणत्याही परिस्थितीत ज्याचे मन शांत असते, त्याला संत एकनाथांनी संत संबोधले आहे. भक्त आणि परमेश्वर यातला एक दुवा म्हणून मन्मथ स्वामी संताकडे पाहतात.

केवळ बाह्यउपाधीने कुणीही संत होऊ शकत नाही, अशी तुकारामांची स्पष्ट भूमिका आहे. वेसनाधीन साधुंना तुकारामांनी स्पष्टपणे नाकारले. नाथ, लिंगायत, महानुभाव, वारकरी, सुफी परंपरेतील वेशधारी साधुंचाही बेगडीपणा तुकारामांनी उघडा केला. भोंदू, आळशी, स्वार्थी, कामचुकार, वासनांध दांभिकापासून समाजाला सावध करण्याचा प्रयत्न तुकारामांनी निष्ठेने केला आहे.

केवळ भक्ती, ज्ञान, कर्म आणि योग यात गुंतून पडलेली समाजविन्मुख व्यक्ती तुकारामांच्या नजरेतून साधू नाही. साधुत्वाच्या नावाखाली संसारापासून लांब पळणे, भिक्षा मागणे तुकारामांना मान्य नाही. मनात मोह ठेवून प्रवचन, कीर्तन, उपदेश करणाऱ्या लोकांचे साधुत्व तुकारामांनी स्पष्टपणे नाकारले. चमत्कार, जडीबुट्टीचें उपचार, भूतबाधा उतरवणे, मंत्र तंत्राची साधना करणे, काळी विद्या जाणणे, शकुन सांगणे अशा गोष्टी करून आपला प्रपंच चालवणाऱ्या लोकांना नाकारून साधू बाबत विवेकांने विचार करायला तुकाराम प्रवृत्त करतात.

संताकडे लौकिक संपत्ती नसली तरी क्षमा, दया, शांती, करुणा आणि सत्य अशा सदगुणांचे भांडवल असते. रंजल्या गांजलेल्यांना जो जवळ करतो तोच संत असे तुकाराम स्पष्टपणे सांगतात. आपल्या कृती आणि उक्तीतून मानवी मूल्यांचे संवर्धन करणारा व्यक्तीच तुकारामांना संत म्हणून अभिप्रेत आहे. सर्वप्रकारच्या लौकिक भेदभावाच्या पलीकडे जाऊन समत्त्वभावाने जगाकडे पाहणाऱ्या व्यक्तीमध्येच तुकाराम संत पाहतात.

ज्याचे अंतःकरण पवित्र आहे त्याला माळा मुद्रांची भुषणे धारण करून देखावा करण्याची आवश्यकता नाही. तुकारामांनी संताची जी लक्षणे सांगितली ती सर्व लक्षणे अगोदर प्रयत्नपूर्वक आपल्या अगी बाणवली. विलक्षण स्थिर राहून जगाचे आघात सहन करतो तोच संत ठरतो. संताची प्रत्येक कृती आणि उक्ती जगाच्या कल्याणार्थच असल्याचे तुकाराम सांगतात.

संत महिमा जाणण्यासाठी आपल्या अंगी संतत्व असले पाहिजे. संतांचा महिमा सूर्याप्रमाणे स्वयंसिद्ध असल्यामुळे तो वेगळा सांगण्याची आवश्यकता तुकारामांना वाटत नाही. ज्याच्या वृत्तीत संतत्व आहे तोच आपल्या जातीचा असल्याचे सांगून त्याच्या भेटीची प्रतिक्षा तुकाराम करतात. अग्नीच्या संपर्कात गेलेली वस्तू अग्नीरून होते त्याच प्रमाणे संतांच्या सहवासात गेलेली व्यक्ती संतरूप होते असा तुकारामांचा विश्वास आहे.

संत आणि देव एकच असून निमित्तमात्र प्रतिमा वेगळया आहेत. जगाच्या उद्धारार्थ देव संतांच्या रूपात साकारला. संतांना टाळून देवाची पूजा करणे तुकाराम अधर्म समजतात. जिवंत संतांना अव्हेरून देवाच्या निर्जिव मूर्तीचे केलेले अभिषेक तुकारामांच्या विवेकाला पटत नाही. देवाच्या पूजेने माणूस देव होऊ शकत नाही; पण संत पूजेने माणूस संतपदी पोहचतो. म्हणून तुकारामांना संत महत्त्वाचे वाटतात. संताप्रमाणे शुद्ध आचरण हीच संताची पूजा असल्याचा जो दृष्टिकोन मांडला तो विलक्षण विवेकनिष्ठ आहे.

संताचे दर्शन टाळणाऱ्या व्यक्तींना तुकाराम अभागी समजतात. संतांच्या गुणदोषाची चिकित्सा करणे म्हणजे फुल पिळून त्यातला गंध शोधल्याप्रमाणे आहे असे तुकाराम सांगतात. तुकारामांचा हा विचार काहीसा एकांगी वाटतो. संतत्त्वाचा बुरखा पांघरून वासना विकारांची पूर्ती करणाऱ्या दांभिकांची चिकित्सा झालीच पाहिजे. संत तुकारामांनी वेशधारी दांभिकाबद्दल सतराव्या शतकात जी निरीक्षणे नोंदवली तेच वास्तव चारशे वर्षांनी आज समाजात आढळते. वर्तमान पार्श्वभूमीवर तुकारामांचा संतविचार पदोपदी प्रासंगिक ठरतो. संतत्त्वाच्या मार्गावर वाटचाल करणाऱ्या विश्वातील तमाम साधकासाठी तुकारामांचे जीवन आणि काव्य दीपस्तंभा प्रमाणे कायम आदर्श ठरते.

**डॉ. रवींद्र बेम्बरे**
प्रमुख, मराठी विभाग,
वै. धुंडा महाराज देगलूरकर महाविद्यालय,देगलूर

प्रमुख, मराठी विभाग
वै.धुंडा महाराज देगलूरकर महाविद्यालय,देगलूर